**Newspaper: Maharashtra Times**

**Article Date: 13/02/17**

**Hunar Event Description article**




## पोदारमध्ये गुरुवारी इंटरकॉलेज फेस्टिव्हल

# दाखवा तुमच्यातलं 'हुनर'

**अमेय मालशे,** कॉलेज क्लब रिपोर्टर
muntainbox@gmail.com

फोटोग्राफी असेल वा चित्रकला, तुमचा कुठलाही आवडता छंद, तुमच्यातली एखादी कला कॉलेज फेस्टिव्हलमध्ये लोकांमोर सादर करण्याची संधी मिळाली तर? हीच संधी घेऊन आलाय माटुंग्याच्या पोदार कॉलेजचा 'हुनर' हा इंटरकॉलेज फेस्टिव्हल. येत्या १६ फेब्रुवारीला सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत हा फेस्ट पार पडेल. 'महाराष्ट्र टाइम्स' या फेस्टिव्हलचा मीडिया पार्टनर आहे.

हॉबी सर्कल ऑफ पोदारतर्फे 'हुनर'चं आयोजन करण्यात आलं आहे. या आगळ्यावेगळ्या फेस्टचं हे पहिलंच वर्ष आहे. 'हुनर दि स्पार्क इन यू' ही या फेस्टची टॅगलाइन असून एकूण सहा इव्हेंट्सचा यात समावेश आहे. या फेस्टमध्ये 'हॉबीहंट'(मोबाईल फोटोग्राफी), 'स्क्रीबलर्स' (उत्स्फूर्त काव्य लेखन) 'कॉमेडी सर्किट' (स्टँडअप कॉमेडी), 'स्मार्ट प्ले' (मोबाईल गेम्स), 'विटीयेस्ट ऑफ देम ऑल' (पझलमेकिंग) या इव्हेंट्सचा समावेश असेल. याबरोबरच 'पेट्समॅश' हा नवीन इव्हेंट सर्वांचं लक्ष वेधून घेणारा आहे. हा डबस्मॅशचाच एक प्रकार आहे. यामध्ये स्पर्धकांनी त्यांच्या पाळीव प्राण्याबरोबरचा त्याचा १० सेकंदांचा व्हिडिओ बनवून आणायचा आहे. त्यातला व्हिडिओ सर्वोत्तम निवडला जाईल. या सर्व स्पर्धांबरोबरच विद्यार्थ्यांनी लहानपणापासून छंद म्हणून जमवलेली नाणी, स्टॅम्पस, फोटो किंवा कात्रणं इत्यादी गोष्टींचं प्रदर्शनही फेस्टमध्ये पाहायला मिळणार आहे. संपर्क : ८८७९३८५३७३

> पोदार कॉलेज नेहमीच मुलांच्या छंदांना आणि त्यांच्या आवडीनिवडींना वाव देण्यासाठी उत्सुक असतं. हुनर हे त्याचंच एक उदाहरण. अभ्यासाबरोबर आपले छंदही जोपासून भविष्यात त्यामध्येच करिअरच्या वाटा शोधण्यासाठी यातून मुलांना नक्कीच फायदा होईल.
>
> **- डॉ. शोबना वासुदेवन,**
> प्रिन्सिपल, पोदार कॉलेज